# 'स्वच्छता दिवस'चा निर्लज्ज तमाशा आणि फेकू प्रसिद्धी
# कचरा नाही तिथे श्रीमंतांनी झाडू फिरवून फोटो काढले

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

महात्मा गांधी यांचे नावही घ्यायचे नव्हते, पण त्यांच्याशिवाय पर्याय नाही म्हणून स्वच्छता दिनाच्या जाहिरातीत महात्माजींचा फोटो घ्यावाच लागला अशी या सरकारची स्थिती आहे. महात्माजींनी नुसत्या जाहिराती देऊन स्वच्छतेचे ढोल पिटले असते तर आज त्यांच्या जयंतीला त्यांचे फोटो कुठेच दिसले नसते. पण ज्या काळात मोबाईल, इंटरनेट नव्हते त्या काळात गांधीजींचा संदेश घरोघरी पोचला. कारण त्यात सच्चाई होती. गांधीजी स्वत: संडास साफ करत आणि नंतर दुसऱ्याला स्वच्छतेचा उपदेश देत असत. आजच्या 'स्वच्छता दिनी' मात्र मळलेले विचार आणि सडलेले मेंदू दिसले. जाहिरातींच्या भपकेपणाच्या आड भंपकपणा दिसला. जिथे कचराच नव्हता, तिथे श्रीमंत हातात झाडू घेऊन उभे होते आणि जिथे कचरा होता, तिथे सफाई कामगार दिसत होता. कडक इस्त्रीचे कपडे, हातात नवे मोजे, तोंडावर नवा मास्क आणि समोर कॅमेरावाल्यांची फौज घेऊन खासदार, आमदार, मंत्री, प्रतिष्ठित रस्त्यावर उतरले. साधा झाडूही त्यांना नीट धरता येत नव्हता. रस्त्यावर त्यांच्यासाठी खास साठवून ठेवलेला सुक्या पानांचा आणि कागदांचा 'प्रदूषणमुक्त' कचरा झाडल्याचा दिखावा झाला. हा स्पेशल कचराही या मान्यवरांनी फक्त एका जागेवरून दुसऱ्या जागेवर ढकलला. कुणीही स्वत: कचरा उचलला नाही. त्यांनी गोळा केलेला कचरा शेजारी उभ्या असलेल्या सफाई कामगाराने उचलला. श्रीमंतांचा, प्रतिष्ठितांचा फोटो निघाला, सफाई कामगार अंधारात राहिला. श्रीमंत आणि प्रतिष्ठित स्वच्छतेचे दूत बनले. कचरा उचलून उचलून ज्याचे आयुष्य रोज काही तासांनी कमी होते, तो कामगार मात्र दुरून तमाशा पाहत राहिला. 'स्वच्छता ही जाहिरातीतून होत नाही, ती हृदयातून हातात उतरावी लागते'. गांधीजींना ते जमले म्हणून ते महात्मा झाले. बाकी सर्व सत्तेवर आले आणि विस्मृतीत गेले.

'स्वच्छता दिवस'च्या निमित्ताने जितक्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या त्या जाहिरातींवर पंतप्रधान होते, मंत्री होते, नेते होते, बँकांचे चेअरमन होते. हा एक दिवस त्यांचा होता. मयताला जाण्यासाठी श्रीमंत जसे परीट घडीचे पांढरे कपडे खास राखीव ठेवतात, तसे आता 'स्वच्छता दिवस' या दिवशी वापरण्यासाठी खास पेहराव राखून ठेवायचा इतकाच त्यांच्या आयुष्यात आजच्या 'कार्यक्रमा'मुळे बदल होणार आहे. स्वच्छतेचा दूत म्हणून आपण ज्या अमिताभ बच्चनची निवड केली आहे, त्यांच्यावर तर पनामा पेपर्स घोटाळ्यात आरोप केले आहेत. पण अशा आरोपांनी प्रतिष्ठितांची प्रतिष्ठा कमी होत नाही. त्यामुळे अमिताभ बच्चन अजूनही जाहिरातीवर आहेत.

जी माणसं खरोखर रस्ते साफ करतात, जी माणसं मैल्यात उतरून ड्रेनेज साफ करतात, जी माणसं हॉस्पिटलमध्ये रुग्णांनी केलेली घाण उचलतात त्या माणसांचे चेहरे कुठेच झळकले नाहीत. या माणसांना चेहरेच नाहीत, या माणसांना स्वत:ची ओळखच नाही, या पातळीवर आपण त्यांना नेऊन ठेवलंय. स्वत:च्या घरातला केर काढायला आपल्याला नोकर लागतो. ही माणसं तर अख्ख्या शहरांची, अख्ख्या गावांची घाण साफ करतात. आपण केलेली घाण, आपण केलेला कचरा ही माणसं रोज उचलतात म्हणून आपण श्वास घेऊ शकतो. मग ही माणसं जास्त प्रतिष्ठित की आपण जास्त प्रतिष्ठित? कधीतरी हा प्रश्न स्वत:ला विचाराल की नाही?

सकाळी ८ वाजता आपण संडास वापरू लागलो की ड्रेनेजमध्ये मैल्याची पातळी वाढत जाते. त्याकरिता आठच्या आत पहाटे ड्रेनेजचे कामगार आपल्या आदल्या दिवशीच्या मैल्यात उतरतात आणि ड्रेनेज साफ करतात. त्या विषारी वायूने अनेकांचा गुदमरून प्राण जातो. त्यांचे कुटुंब उजाड होते. परंतु कुणी त्यांच्या वारसाला नोकरी देत नाही की मदतीचा चेक




देत नाही. आपण साखरझोपेत असतो आणि हे ड्रेनेज कामगार आपण केलेल्या घाणीत उतरत असतात. तुम्ही सांगा कोण श्रेष्ठ आहे? ते की तुम्ही? आपण आवरून घरातून बाहेर पडतो तेव्हा रस्ते साफ दिसायला हवेत म्हणून सफाई कामगार सकाळी रस्ते साफ करतात. आपण मॉर्निंग वॉकला जातो, जॉगिंगला जातो, स्वीमिंगला जातो. स्वत:च्या प्रकृतीला आपण फार जपतो. पण आपण दिवसभर जो कचरा केलेला असतो, तो सकाळी उठून साफ करणाऱ्या त्या सफाई कामगारांच्या प्रकृतीचे काय? ते आपली घाण काढत बसतात. त्यामुळे त्यांना मॉर्निंग वॉक नसतो, त्यांना जॉगिंग नसते, त्यांना स्वीमिंग नसते. अशा या स्वच्छता दूतांकडे आपण बघतही नाही.

सफाई कामगारांच्या चौक्या कुणी बघितल्यात? ते जिथे सामान ठेवतात, हजेरी लावतात, त्यांना चौक्या म्हणतात हे तरी माहीत आहे का? या चौकीत त्यांचे सामान ठेवायला जागा नसते, महिलांना कपडे बदलून हिरवी साडी नेसायला जागा नसते, पिण्याचे पाणी नसते, सकाळी न्याहारी फूटपाथवर बसून करावी लागते. आपण त्यांची दखलच घेत नाही. बसमध्ये किंवा लोकलमध्ये एखादा सफाई कामगार शेजारी येऊन बसला असता आपल्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव होते. आपण नाक मुरडून उठून जातो. स्वच्छता दिनी आपण हेच केले. त्यांचा सत्कार केला नाही. त्यांची विचारपूस केली नाही, कचरा भरलेला डबा उचलून तो गाडीत कसे टाकत असेल, असा विचारही आपल्या मनात आला नाही. एकाही जाहिरातीत त्यांना स्थान दिले नाही. अमिताभ बच्चनने एक कागदही उचलला नसेल तो आपला स्वच्छता दूत बनला आणि जे खरोखर कचरा साफ करतात ते दुर्लक्षित राहिले.

स्वच्छता अभियान कधी यशस्वी होईल? हे अभियान तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा या ड्रेनेज कामगारांना, या सफाई कामगारांना, या हॉस्पिटल कामगारांना आपण मनापासून सन्मानाचे स्थान देऊ. आपण कचरा करतोय, आपण घाण करतोय आणि आपल्यासारखाच एक हाडामासाचा माणूस आपण केलेली घाण उचलतोय, याची ज्या दिवशी आपल्याला लाज वाटेल त्याच दिवशी स्वच्छता अभियान यशस्वी होईल. त्यांना आपण माणसाचा दर्जा देऊ, तेव्हाच हे अभियान यशस्वी होईल. कारण आपण त्यांच्यावर अन्याय करतोय, हे आपल्या लक्षात येईल आणि आपण त्यांच्या खांद्यावर कचऱ्याचा भार न टाकता स्वत: कचऱ्याचे व्यवस्थापन करू. माणसाचा विकास तेव्हाच होतो, जेव्हा तो प्रत्येकाबद्दल संवेदनशील बनतो.

गांधीजी महात्मा का झाले? कारण तुडुंब भरून वाहणाऱ्या साबरमती नदीला आपल्या आश्रमात बसून पाहत असताना त्यांना दुष्काळात अडकलेल्या शेतकऱ्यांचे दु:ख कळले, पाण्याचे महत्त्व जाणवले. त्या तुडुंब भरलेल्या साबरमतीच्या साक्षीने त्यांनी स्वत:चा ग्लास कायम अर्ध्या पाण्याने भरून पाणीबचतीचा संदेश दिला. ती दृष्टी आज कुठे आहे? महाराष्ट्रातील प्रत्येक शहर हगणदारीमुक्त झाले म्हणणाऱ्या या राज्य सरकारच्या मंत्र्यांना सकाळी लोकलने फिरवले तरी त्यांना रुळांवर सत्य दिसेल. किंबहुना त्यांना सत्य माहीतच आहे. पण 'स्वच्छता दिन' जाहिरातीतून साजरा करायचा असे त्यांनी ठरवून टाकले आहे. या जाहिरातीवर कोट्यवधी उधळून खोटेपणा केला आणि स्वच्छता दिनीच घाण केली.